महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२७ वा | दिनांक : ०४/०७/२०२५ | वार : शुक्रवार

# मुंबईत व्यापाऱ्यांच्या मोर्चानंतर मनसेचे बीजेपी ला थेट आव्हान



**मुंबई :** ठाण्यात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी गुजराती दुकानदाराला मारहाण केली होती. या घटनेचा व्हिडिओ देखील प्रचंड व्हायरल झाला होता. या घटनेचा तीव्र निषेध करत आज संपूर्ण मीरा भाईंदर मधील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत आपला संताप व्यक्त केला. तसेच या मारहाण केल्यावरून या व्यापाऱ्यांनी मार्च देखील काढला. मात्र, हा मोर्चा व्यापाऱ्यांचा नसून भारतीय जनता पक्षाचा आरोप मनसेने केला आहे. या संदर्भात मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी भाजपविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सदरील प्रकरणात मनसे कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्याला मारहाण करतानाचा व्हिडिओ समोर आला. मात्र, त्या आधी तो व्यापारी काय म्हणाला? ते समोर आलेले नाही. त्या व्यापाऱ्याने मजुरीची भाषा केली, त्यामुळे त्याला आधी हात जोडून विनंती केली. नंतर हात सोडून विनंती केली असल्याचे मनसे नेते संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे. मराठी भाषेचा कोणत्याही प्रकारचा अपमान सहन करणार नसल्याचेही संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे. मराठीचा अपमान केला तर कानाखाली पडणारच, अशी प्रतिक्रिया देशपांडे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली आहे.

मीरा भाईंदर मधील मोर्चा हा व्यापाऱ्यांचा नाही तर भारतीय जनता पक्षाचा असल्याचा आरोप मनसे नेते अविनाश जाधव यांनी केला आहे. सदरील व्यापाऱ्याची आपण कालच भेट घेतली होती. त्यावेळी आमच्यात काय ठरले होते? हे ते त्या व्यापाऱ्यालाच विचारा, असे आवाहन देखील अविनाश जाधव यांनी केले आहे. मराठी माणसासाठी भाजप कधीच भूमिका घेत नाही. हा मोर्चा निघावा यासाठी सतत पाठपुरावा करणारा भारतीय जनता पक्षाचा कोणता नेता होता? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. आजचा मोर्चा हा भारतीय जनता पक्ष प्रेरित होता आणि बळजबरीने व्यापारी यात सहभागी झाले होते, असे देखील जाधव यांनी म्हटले आहे.

भारतीय जनता पक्षाने मराठी माणसाच्या विरोधात काढलेला हा मोर्चा असल्याचे अविनाश जाधव यांनी म्हटले आहे. तसेच हा मराठी माणसाचा अपमान असल्याचा आरोप अविनाश जाधव यांनी केला आहे. इतकेच नाही तर आम्ही देखील आगरी कोळी समाजाला घेऊन मीरा भाईंदर मधील मराठी माणसांना एक करून भारतीय जनता पक्षाच्या विरोधात मोर्चा काढणार असल्याचा इशारा अविनाश जाधव यांनी दिला आहे.

# लक्ष्मण हाके समाजात तेढ निर्माण करण्यासाठी वादग्रस्त विधान करतात



**पुणे :** दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी लक्ष्मण हाके हे जाणीवपूर्वक वादग्रस्त विधान करत असून, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस त्यांची चड्डी पिवळी केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी दिला आहे. तसेच लक्ष्मण हाके यांची हालत भटक्या कुत्र्यासारखी करू, असेही त्यांनी म्हटले आहे. लक्ष्मण हाकेंना महाराष्ट्रात फिरू दिले जाणार नाही, असा इशाराही चव्हाण यांनी दिला. लक्ष्मण हाके यांच्यावर प्रतिक्रिया देताना सुरज चव्हाण यांची जीभ घसरल्याचे चित्र दिसून आले.

लक्ष्मण हाके यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली होती. त्यावर सुरज चव्हाण यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले, लक्ष्मण हाके जाणीपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अजित पवार यांच्यावर बोलण्याची लक्ष्मण हाके यांची लायकी नाही. तुम्हाला योग्य जागा दाखवण्याची आमची जबाबदारी असल्याचे सुरज चव्हाण म्हणाले.

पुढे बोलताना सुरज चव्हाण म्हणाले, लक्ष्मण हाकेंना माझं खुलं आव्हान आहे की, पुढच्या १० दिवसात त्यांनी महाराष्ट्रात खुलं फिरुन दाखवावं असे सुरज चव्हाण म्हणाले. हाकेला जशाच तसं उत्तर देऊ. भटक्या कुत्र्याचा कसा उपचार करायचा याची माहिती आम्हाला आहे. प्रसिद्धीसाठी बोलणाऱ्या भटक्यांना त्यांची जागा दाखवली जाईल.

लक्ष्मण हाके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अजित पवार हे राज्याचे अर्थमंत्री देखील आहेत. अजित पवार यांच्या अर्थ खात्याकडून ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, असा लक्ष्मण हाके यांचा आरोप आहे. याउलट मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आणि सारथी संस्थेला पैसे दिले जातात. पण महाज्योती संस्थेला पैसे दिले जात नाहीत. तसेच ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही, असा आरोप लक्ष्मण हाके आणि त्यांच्या समर्थकांचा आहे. लक्ष्मण हाके यांनी त्यांच्या समर्थक आणि काही विद्यार्थ्यांसह गिरगाव चौपाटी परिसरात जलसमाधी आंदोलन केलं. लक्ष्मण हाके भर समुद्रात खोलवर गेले. तिथे त्यांनी घोषणाबाजी करत आंदोलन केलं.

# दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंना क्लीन चीट



**मुंबई :** दिशा सालियन मृत्यू प्रकरणात महत्वाची घडामोड समोर आली आहे. या प्रकरणात आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांना कोणताही पुरावा आढळलेला नसल्याचं मुंबई पोलिसांनी हायकोर्टात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यामुळे आदित्य ठाकरेंना या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे.

दिशा सालियन हिची हत्या व लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप तिच्या वडिलांनी आणि भाजप आमदार नितेश राणे यांनी केला होता. यासंदर्भात हायकोर्टात याचिकाही दाखल करण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी स्पष्ट केलं आहे की, शवविच्छेदन अहवालात दिशाच्या शरीरावर कोणताही लैंगिक किंवा शारीरिक अत्याचार झाल्याचे संकेत नाहीत. तिच्या मृत्यूचे कारण डोक्याला जबर मार लागल्यामुळे झालेलं आहे.

पोलिसांनी हेही नमूद केलं की, दिशा प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्याविरोधात कोणतेही थेट पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या आरोपांना कोणताही कायदेशीर आधार नाही. त्यामुळे या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसंदर्भातील याचिका फेटाळण्याची विनंतीही पोलिसांनी केली आहे.

दिशा ही दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर होती, आणि सुशांतच्या मृत्यूनंतर या दोन्ही प्रकरणांना जोडून काही नेत्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर संशय व्यक्त केला होता. मात्र, आता पोलिसांच्या सखोल तपासानंतर त्या आरोपांना अधिकृतरीत्या खोटं ठरवलं गेलं आहे.

पोलिसांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात दिशावर कोणताही लैंगिक अत्याचार झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच तसेची तिची हत्या केली नसल्याचे देखील सांगितले. दिशाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचेबाबत तिच्या शवविच्छेदन अहवालातून तिच्या डोक्याला मार लागल्याने तिचा मृत्यू झाल्याचे पोलिसानी स्पष्ट केले. तसेच न्यायालयात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यासंदर्भात केलेल्या याचिका फेटाळण्याची मागणी देखील पोलिसांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ जुलै २०२५


## अवैध रीतीने गोवंश घेऊन जाणारी चार पिकअप व्हॅन सह लाखों रुपये किमतीचे मुद्देमाल जप्त



**दौलताबाद (जावेद अहमद) :** पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दौलताबाद पोलिसांनी समृद्धी महामार्गांवर वेरूळ इंटरेचेंज वर टोलनाक्यावर चार वाहने पकडली २० लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त एक आरोपी अटकेत तीन आरोपी चालकांनी धूम ठोकलीगुप्त बातमीदार कडून दौलताबाद पोलिसांना माहिती मिळाली की चार वाहनात कोंबून गोवंश कत्तली साठी घेऊन जात असल्याचे माहिती मिळाली त्या आधारे पोलिसांनी समृद्धी महामार्गांवर पहाटे चारच्या सुमारास सापळा लावून थांबले असता. चार वाहना मधून गोवंश कोंबून नेते असल्याचे पोलीसाना निदर्शनास आले.या सर्व वाहनांना पोलिसांनी ताब्यात घेत या चार वाहनामधील 22 गोवंश ताब्यात घेत त्यांची रवानगी गोशाळेत करण्यात आली. या वाहणातील चालक आरोपी-1) समीर दस्तगीर मदारी (वय 19) रा. देवगाव रंगारी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर व इतर तीन वाहणातील चालक वाहन सोडून पळून गेले. यात वाहन क्रमांक पिकअप बोलेरो क. MH 15CK 0319 चा चालक ,पिकअप बोलेरो क. MH 15FV 3583 चा चालक , पिकअप बोलेरो क्र. MH 43 AD 9305 चा चालक यांचा फरारी मध्ये समावेश आहे.या कार्यवाहीत चार पिकअप बोलेरो व गोवंश मिळून एकुण वीस लाख एकष्ठ हजार रुपये किंमतीचे वाहने व जनावरे मिळुन आले.ही कार्यवाही पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उप निरीक्षक सुनील बोडखे,आयुब पठाण,सहायक पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र भोसले, भारत धुमाले, अभिमन्यू जाधव, योगेश सूर्यवंशी, महेश घुगे, ज्ञानेश्वर कोळी, नितीन कापडे यांच्या पथकाने केली आहे.या नंतर पोलिसांनी इतर सर्व जनावरे सुरक्षितपणे गोशाळेत जमा केली.दौलताबाद पोलीस ठाण्यात गु र न=109/2025 प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधि 1960 कलम 11(1) (डी) सह कलम 192 मो. वा. का नुसार दौलताबाद ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोली

## डॉ. प्रभाकर शेळके यांना राज्यस्तरीय स्वाभिमानी साहित्य काव्य पुरस्कार



**कराड :** येथील अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्षसेना वपिराजी थोरवडे सामाजिक संस्था कराड. मा. संस्थापक अध्यक्ष पिराजी थोरवडे यांच्या वाढदिवसानिमित्याने राज्यस्तरीय काव्य पुरस्कार कवीवर्य डॉ प्रभाकर शेळके यांच्या वंचितांचे निळेपंख मिलिंद जगताप यांच्या सौरव प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या काव्यसंग्रहासह पुरस्कार मिळाला. शब्द स्नेही कवीवर्य सन्मित्र विक्रम शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.निवड समितीचे अध्यक्ष साहित्यिक सत्यवान मंडलिक हे होते.शेळके यांच्या यशाबद्दल प्रा. मधुकर जोशी, प्रा डॉ रावसाहेब ढवळे,प्रा.बसवराज कोरे, मिलिंद काळे डॉ सुहास सदावर्ते, कैलास भाले मनीष पाटील सुनील लोणकर प्रा डॉ. रंजित बायस, डॉ सुजाता देवरे, डॉ. बळीराम बागल, प्रा डॉ. रवीकिरण भूतेकर, प्रकाश कुंडलकर, मनीषा पाटील, वैशाली फोके, निलेश जोशी कल्याण सोळुंके इ. अभिनंदन केले.

## जेइएस महाविद्यालयात पुणे येथील प्राचार्य डॉ. माने यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे पुणे येथील प्राचार्य डॉ प्रदीप माने यांचे अभियांत्रिकी सुधारित प्रवेश प्रक्रिये संदर्भात व्याख्यानाचे आयोजन दिनांक ५जुलै २०२५ शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता शेठ चुनीलाल गिरीलाल गोयल सभागृहात, जे ई एस महाविद्यालय जालना येथे करण्यात आले आहे.सदरील कार्यक्रमात प्राचार्य डॉ.प्रदीप माने हे विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी मधील विविध शाखा व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या वेगवेगळ्या विविध शिष्यवृत्ती संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. जालना शहरातील बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित घ्यावे, या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री व कार्यक्रमाचे संयोजक उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना यांनी केले आहे. यावेळी इयत्ता बारावी उत्तीर्ण झालेल्या जेइएस महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही केला जाणार आहे.

## सरकारने शेतकऱ्यांना निवडणुकीपुरते आश्वासन दिले - भास्कर जाधव



**मुंबई :** विधानसभेत बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित करत सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला. तसेच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून ५० हजार रुपये देण्यात यावे, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

भास्कर जाधव म्हणाले, मे महिन्यात अवेळी पाऊस पडला. यामुळे अनेक ठिकाणी नद्यांचे पाणी पात्राबाहेर गेले आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. १४ मे पासून रोजच पाऊस सुरू झाला. या पावसाने मोठी दाणादाण उडवली आहे. मराठवाड्यातील व विदर्भातील २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही आकडेवारी जानेवारी ते मार्च पर्यंतच्या आहेत. वर्षभरात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मागच्या निवडणुकीच्या वेळी त्यांना आश्वासने दिली होती. आम्ही सात बारा कोरा करू असे सांगण्यात आले. पण आता हे सरकार म्हणत आहे कर्जमाफी करू, पण योग्यवेळी करू. लाडक्या बहिणींना म्हणाले २१०० रुपये देणार, नाही दिले. हे आश्वासने केवळ निवडणुकीपुरते होते.

पर हेक्टरी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून किमान ५०००० रुपयांची तात्काळ मदत करण्याची गरज आहे. पंचनामे झालेले नाहीत. ऑनलाइन पद्धतीने पंचनामे केले जात आहेत, पण त्या ठिकाणी नेटवर्कच नसेल तर काय करणार? शेतकऱ्यांना माहिती देणे गरजेचे आहे. ऑफलाइन पद्धतीने देखील पंचनामे केले जावेत, अशी माझी मागणी आहे. शेतकऱ्यांचे कर्जमाफी केले जावे, सौरऊर्जा प्रकल्प मोफत देण्यात यावे, किती जणांकडे आहे सौरऊर्जा प्रकल्प? एक रुपयात पिकविमा ही योजना फसवी ठरली.

शेतकऱ्यांची चेष्टा केली जात आहे. कृषिमंत्री स्वतः टिंगल टवाळी करतात, कर्जमाफीच्या पैशातून काय मुली बाळांचे लग्न करायचे आहेत का? असे त्यांनी म्हटले होते. शेतकऱ्यांनी असे स्वप्न कधी बघू नये का? असा सवाल भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. आजकाल भिकारी सुद्धा एक रुपया घेत नाही, आम्ही एक रुपयांत पिकविमा दिला, असेही विधान कृषिमंत्र्यांनी केले होते. ती योजनाच रद्द झाली. तुमच्या काय ढेकळाचा पंचनामा करायचा का? असेही ते म्हणाले, असे कोणी शेतकऱ्यांना म्हणू शकते का? पण हा सत्तेचा माज आहे.

भास्कर जाधव म्हणाले, बबनराव लोणीकर म्हणतात तुमच्या आईच्या अंगावरचं पातळ माझ्या बापामुळे येतात. तुमच्या अंगावरचे कपडे माझ्या बापामुळे येतात. २०१४ पूर्वी सरकार नव्हते का? ही लोकशाही आहे. कोणाचा उपमर्द करण्याचा अधिकार कोणी दिला? माणसाचा मोठेपणा तेव्हाच असतो जेव्हा त्याच्याकडे नम्रता असते. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षातील नाते कसे असले पाहिजे, जेव्हा आम्ही सत्तेत होतो, काँग्रेस सत्तेत होती, तेव्हा विरोधी पक्षातील लोक अश्लाघ्य भाषेत बोलायचे आणि आम्ही ऐकून घेत होतो. आता हे सरकार एक शब्द सुद्धा ऐकून घेत नाहीत.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ जुलै २०२५

## भाजप म्हणजे डरपोक लोकांची 'डी गँग' : संजय राऊत



**मुंबई :** आजचा भारतीय जनता पक्ष म्हणजे डरपोक लोकांची 'डी गँग' असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. नाशिक मधील उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश होणार आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी भाजप उद्या दाऊद इब्राहिम याला देखील पक्षात प्रवेश देईल, असा आरोप केला. इतकेच नाही तर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केलेल्या आरोपांना देखील त्यांनी प्रत्युत्तर दिली आहे.

नाशिक मधील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक आणि महानगर प्रमुख मामा राजवाडे देखील भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या सर्वांवर गुन्हा दाखल झालेला असून अटक होण्याच्या भीतीने ते पोलिसांच्या रेकॉर्डनुसार फरार आहेत. असे फरार आणि डरपोक लोकच भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. तुमच्यावर भ्रष्टाचार, दंगे, बलात्कार असे कोणते गुन्हे दाखल असेल तरच तुम्हाला भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश दिला जातो, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

ज्या व्यक्तीने तीन-तीन वेळा पक्ष बदलले आहेत. जी व्यक्ती स्वतःचा पक्ष चालवू शकली नाही. जी व्यक्ती काँग्रेसमध्ये गेली त्याने काँग्रेसला शिव्या दिल्या. भाजपमध्ये गेली तिथेही त्यांचे सुरुवातीपासून काही जुळले नाही. शिवसेनेमध्येही त्यांनी शेवटी- शेवटी गोंधळच घातला. अशा व्यक्तीला महाराष्ट्र फार गांभीर्याने घेत नाही. अशा शब्दात राऊत यांनी नारायण राणे यांच्यावर पलटवार केला. भाजपमध्ये गेलेला प्रत्येक मराठी माणूस हा महाराष्ट्राचा शत्रू आहे. त्यांनी मराठी माणूस आणि महाराष्ट्र यावर प्रवचन झाडण्याचा अधिकार नाही. नारायण राणे यांनी भाजपमध्ये जाऊन कोकणातील मराठी माणसाचे नुकसानच केले आहे. नारायण राणे यांच्या सारखे सर्व गुलाम नसतात. चामडी वाचवण्यासाठी काही पक्ष बदलत नाहीत. काही स्वाभिमानी लोक आहेत त्यांच्यामुळे आजही महाराष्ट्र टिकलेला आहे. तुम्ही आहात म्हणून किंवा भाजप आहे म्हणून महाराष्ट्र टिकलेला नाही. त्यामुळे आता नारायण राणे यांनी वयाचे तरी भान राखावे, असा सल्ला देखील राऊत यांनी दिला.

नरेंद्र जाधव हे अर्थतज्ज्ञ आहेत. मात्र त्यांचे संघ परिवाराशी संबंध आहेत. असे म्हणत संजय राऊत यांनी त्रिभाषा सूत्र संदर्भात अभ्यास करणाऱ्या समितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र, समितीचे अध्यक्षपदी कोणीही असले आणि कोणी कसाही अहवाल दिला तरी, मराठी वर होणारा अन्याय आणि हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्र कदापि सहन करणार नाही. महाराष्ट्र कोणत्याही समितीचा अहवाल स्वीकारणार नाही, असे देखील राऊत यांनी स्पष्ट केले.

मराठी भाषेसंदर्भात पाच जुलै रोजी होणाऱ्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर कमीत कमी गर्दी असावी, व्यास पीठावरील मुख्य आकर्षण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हेच असावे, लोकांनी तुफान गर्दी करावी आणि विजयी जल्लोष साजरा करावा. या व्यतिरिक्त या कार्यक्रमात कोणताही प्रोटोकॉल नाही. असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## इंग्रजीचा आग्रह धरणाऱ्यांना पासपोर्ट - व्हिसा काढून थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा - सुधीर मुनगंटीवार



**मुंबई :** महाराष्ट्रात हिंदी - मराठीच्या मुद्यावरून मोठे वादंग माजले आहे. या प्रकरणी सत्ताधारी व विरोधकांत राजकीय चिखलफेक झाली. त्यानंतर आज विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत पुन्हा एकदा भाषेचा मुद्दा उपस्थित झाला. पण यावेळी भाषा होती ती म्हणजे इंग्रजी. या प्रकरणी सत्ताधारी भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या इंग्रजी कार्यक्रम पत्रिकेवर तीव्र आक्षेप घेतला.

त्याचे झाले असे की, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असणाऱ्या ऊर्जा खात्याच्या कारभारावर तोंडसूख घेतले. त्यानंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित करत कामकाजाची पत्रिका इंग्रजीत छापल्यावर तीव्र आक्षेप नोंदवला. महाराष्ट्र विधानसभा नियमांत कामकाज मराठी, हिंदी, इंग्रजीत चालेल अशी तरतूद नक्कीच आहे. पण साधारणपणे मीही १९९५ पासून या सभागृहात आहे. यापूर्वी आपली कार्यक्रम पत्रिका मी केव्हाच इंग्रजीत पाहिली नाही, असे ते म्हणाले. त्यावर समोरच्या बाकांवरून हे पहिल्यापासून आहे, असे उत्तर आले. त्यावर मुनगंटीवार यांनी त्यांनाच कडक शब्दांत सुनावले.

ते म्हणाले, ऐकूण तर घ्या ना. पहिल्यापासून आहे म्हणजे? सनदी अधिकाऱ्यांना आपण मराठी शिकवायला लावतो. इकडे मराठी अभिजात भाषा करायची व मराठी ज्यांना बोलता येत नाही, त्यांना हिंदीची संधी असताना जबरदस्तीने इंग्रजी वापरायला सांगायची. मग हिंदीत बोलावे. कार्यक्रमपत्रिका हिंदीत घ्यावी. हिंदीच्या सक्तीला विरोध करायचा आणि इंग्रजीवर प्रेम दाखवायचे. इंग्रजीला आलिंगन द्यायचे. हा माझा आक्षेप आहे.

सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी नियमावलीतून इंग्रजी शब्द काढून टाकण्याचीही मागणी केली. महाराष्ट्र विधानसभा नियम तयार करताना इंग्रजीचा प्रभाव असेल. माझी विनंती आहे. एकदा नियम समितीची बैठक घ्या. इंग्रजी शब्द जिथे - जिथे असेल तो तिथून काढून टाकावा. मराठी शिकलीच पाहिजे. अभिजात भाषा आहे. समजा एखाद्याला खूप अडचण असेल तर हिंदी आहे. पण फारच इंग्रजीशिवाय समजत नसेल तर पासपोर्ट - व्हिसा काढून अशांना थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा. ही काय पद्धत आहे?, असे ते आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ जुलै २०२५


## ठाकरे बंधूंची स्वतःच्या अस्तित्वासाठी धडपड - नारायण राणे



**मुंबई :** भाजप खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी गुरुवारी पुन्हा एकदा ठाकरे बंधूंच्या मनोमिलनावर टीका केली. राज व उद्धव ठाकरे हे दोघे बंधू स्वतःच्या स्वार्थासाठी एकत्र येत आहेत. या दोघांचीही सध्या स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड सुरू आहे, असे ते म्हणालेत. राज व उद्धव ठाकरे एकत्र आल्याने भाजपला काहीही फरक पडणार नाही, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख यांनी मराठीच्या मुद्यावरून एकत्र येण्याची घोषणा केली आहे. त्यांचा पहिला संयुक्त मेळावा ५ जुलै रोजी मुंबईत होणार आहे. या पार्श्वभूमीवर नारायण राणे यांनी गुरूवारी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, राज व उद्धव ठाकरे स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत आहेत. ते सध्या स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी एकत्र येत आहेत. हे दोन भाऊ एकत्र येणार असतील तर त्याचा एवढा गवगवा करण्याची गरज नाही.

त्यांनी एकमेकांना घरी बोलवावे, एकत्र जेवावे, एकमेकांना मिठ्या माराव्यात. पण त्यांनी आम्ही मराठीसाठी एकत्र येत आहोत असे भासवण्याचा प्रयत्न करू नये. या दोघांनी आतापर्यंत मराठीसाठी मराठी तरुणांच्या नोकरी व रोजगारासाठी काय केले? हिंदी भाषा लादण्याच्या निर्णयावर कुणाची स्वाक्षरी आहे? उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना हा निर्णय रद्द का केला नाही? असा सवाल नारायण राणे यांनी यावेळी ठाकरे बंधूंवर निशाणा साधताना केला.

ते पुढे म्हणाले, कौटुंबिक वाद चव्हाट्यावर आणणे योग्य नाही. राज ठाकरे यांनीच त्यावर बोलावे. पण उद्धव ठाकरेंनी त्यांना शिवसेनेत राणे अवघड केले होते हे सत्य आहे. राज यांचा एकही निर्णय तेव्हा मान्य केला जात नव्हता. उद्धव यांच्यासोबत आज कुणीही नाही. दोन भाऊ एकत्र येण्याचा आनंद आहे. पण आज किती टक्के मराठी माणूस मुंबईत राहिला आहे? याला जबाबदार कोण? हे सोयीचे, फायद्याचे व कुटुंबाच्या स्वार्थाचे राजकारण आहे.

राज व उद्धव ठाकरे एकत्र आल्याने भाजपला काहीही फरक पडणार नाही. आम्ही मराठी नाही का? आम्ही त्यांच्याहून जास्त मराठी माणसांसाठी काम केले आहे. मला उद्धव ठाकरे यांचा एकही चांगला गुण माहिती नाही. पण राज ठाकरे यांचा स्वभाव रोखठोक आहे. उद्धव ठाकरेंनी अडीच वर्षात सत्ता व हिंदुत्व दोन्ही गमावले. आत्ता राज ठाकरे चुकत आहेत किंवा नाही हा माझा प्रश्न नाही. पण त्यांच्या हाती काहीही लागणार नाही, असे ते म्हणाले.

नारायण राणे यांनी यावेळी दिशा सालियन प्रकरणावरही भाष्य केले. ते म्हणाले, माझी दिशा सालियन प्रकरणावर बारीक नजर आहे. एसआयटीने दिलेला रिपोर्ट खराच असेल असे नाही. अनेक पोलिस रिपोर्ट खोटे असतात. पोलिसांचा रिपोर्ट काहीही असला तरी माझा त्यावर विश्वास नाही. कोर्ट अंतिम निर्णय देत नाही तोपर्यंत मी त्यावर विश्वास ठेवणार नाही, असे ते म्हणाले.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी समुद्रात उतरले लक्ष्मण हाके



**मुंबई :** राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर वातावरण आधीच तापलेले असताना, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सरकारच्या धोरणांचा खरपूस समाचार घेत गिरगाव चौपाटीवर जलसमाधी आंदोलन छेडले आहे.महाज्योती योजनेच्या निधीअभावी ओबीसी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात आहे, हे कारण देत हाके यांनी थेट समुद्रात उतरून आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या.

हाके यांच्यासह विद्यार्थी व कार्यकर्ते थेट समुद्रात उतरले. "उठ ओबीसी जागा हो, संघर्षाचा धागा हो!" अशा घोषणांनी चौपाटी दणाणून सोडली. आंदोलनावेळी सरकारमधील ओबीसी नेते आणि मंत्र्यांचा देखील तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. आंदोलनाची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून हाके आणि त्यांच्या समर्थकांना ताब्यात घेतले.

हाके यांनी स्पष्टपणे सांगितले की, सारथी व बार्टीला कोट्यवधींचा निधी मंजूर होत असतानाही महाज्योती योजनेला तीन वर्षांपासून सातत्याने डावलले जात आहे. यामुळे हजारो ओबीसी विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून शासनाने याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला.

यावेळी हाके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर थेट तोफ डागली. लक्ष्मण हाके म्हणाले की, अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांनी या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. त्यामुळे ओबीसी समाज त्यांच्यावर प्रचंड नाराज आहे. जर मुख्यमंत्री शिंदे यांनी यामध्ये हस्तक्षेप केला नाही, तर महाज्योतीच्या प्रश्नावर राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडले जाईल.

लक्ष्मण हाके म्हणाले की, जर अजित पवारांना अर्थखात्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव नसेल, तर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा आणि माळेगाव तालुका अध्यक्ष म्हणूनच काम पाहावं. पैसा आणि सत्तेच्या राजकारणाचं धोरण हे पवार कुटुंबाची परंपरा आहे, असा घणाघात करत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवरही हल्ला चढवला.






## अभिनेत्रीच्या मुलाची ५७ व्या मजल्यावर उडी मारून आत्महत्या



**मुंबई :** मुंबई पश्चिम उपनगरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. टीव्ही सिरियलमध्ये काम करणाऱ्या अभिनेत्रीच्या मुलाने ५७ व्या मजल्यावर उडी मारून आत्महत्या केली आहे. या धक्कादायक घटनेमुळे कांदिवली परिसर चांगलाच हादरला आहे. मुलाने ट्यूशनला जाण्यास नकार दिल्यानंतर देखील आईने त्याला ट्यूशनला जाण्यास सांगितल्याने सदरील मुलाने रागाच्या भरात हे कृत्य केल्याचे सांगितले जात आहे.

किरकोळ कारणामुळे अनेकदा आत्महत्यांच्या घटना या आधी देखील समोर आल्या आहेत. त्यातच आता मुलाला ट्यूशनला जाण्यास आईने जबरदस्ती केल्याने मुलगा आणि आई मध्ये वाद झाला होता. त्यामुळे मुलाने रागाच्या भरात इमारतीच्या ५७ व्या मजल्यावरून खाली उडी टाकली. इतक्या उंचीवरून खाली पडल्यामुळे मुलाचा जागीच मृत्यू झाला. आत्महत्या करणारा मुलगा हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याची आई गुजराती सिरियलमध्ये काम करत होती. त्यामुळे कांदिवली परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी मुलाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला असून या प्रकरणात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तसेच मुलाने नेमकी कोणत्या कारणामुळे आत्महत्या केली? त्याला उडी मारताना कोणी पाहिले का? या प्रश्नांची उत्तर पोलिस तपासत आहेत. मुलाने रागाच्या भरात सदरील कृत्य केले की, आणखी काही नवीन माहिती समोर येते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.